# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
तार — EDUTECH E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet http/www.dte.org.in

ईमेलव्दारे

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/३८
दिनांक : ९।२।२०१७

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांना माहिती देण्याबाबत.**

**उपरोक्त विषयाबाबत या संचालनालयास प्राप्त झालेल्या शासनाच्या दिनांक ८.२.२०१७ रोजीच्या ईमेलच्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये तसेच अशासकीय अनुदानित संस्थांमधील गट अ ते गट ड संवर्गातील सन २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचा-यांची माहिती सोबतच्या प्रपत्रामध्ये भरून तात्काळ या संचालनालयास पाठवावी जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.**

९।२।१७

**( ए.सी. अत्तार )**
**विशेष कार्य अधिकारी,**
**तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

जा.क. विकाऔ/आस्था-३/२०१७/५४२
दिनांक 13 FEB 2017

प्रति
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव तंत्रशिक्षण मंडळ, प्रा. का. औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/नांदेड/हिंगोली/
पु.ला.लातुर/म.नि.लातुर/उस्मानाबाद/बीड

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या उपरोक्त पत्रानुसार मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांना शासकीय कार्यालयामधील गट-अ ते गट-ड संवर्गातील सन २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांची माहिती सादर करावयाची असल्यामुळे सोबत जोडलेल्या प्रपत्रातील माहिती दि.१४-२-२०१७ दुपारी ३-०० पर्यंत सादर करण्यात यावी, जेणेकरुन सदर माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सुलभ होईल.

१३/२
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

विरोधी पक्षनेता
महाराष्ट्र विधानसभा

679
07/02

जा. क्र. : विप्रने/ 2८00 दि. 20/1/2017
कार्यालय दूरध्वनी : २२०२४२६२ टेलीफॅक्स : २२०४२७०२
निवास : २२०२९५४१ टेलीफॅक्स : २२८२०४१३
विधानभवन : २२०२७३९९ विस्तार क्र. : ३०२५
टोल फ्री : १८००२२१०३२

दि. २०.१.२०१७

विषय : माहिती मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाच्या / आपल्या विभागाच्या अंतर्गत कार्यरत असणा-या सर्व शासकीय यंत्रणा, निमशासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानीत संस्था व सर्व प्रकारच्या आस्थापना, ज्या आस्थापनांना महाराष्ट्र शासनाचे पेन्शन विषयक कायदे लागू होतात अशा आस्थापनांबाबतची खालील मुद्दांबाबतची माहिती मला उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

- सन २००५ नंतर सेवेत रुजू झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या / निम शासकीय कर्मचा-यांच्या वर्गवारीनुसार एकूण संख्या.
- या सर्व कर्मचा-यांपैकी वर्गवारी नुसार NPS क्रमांक नसणा-या कर्मचा-यांची संख्या
- या सर्व आस्थापनामध्ये सन २००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचा-यापैकी अपघाताने किंवा इतर कारणाने मृत झालेल्या कर्मचा-यांची संख्या.
- त्यातील ज्या दिवगंत कर्मचा-यांच्या वारसांना लाभ मिळालेला नाही अशा कर्मचा-यांची संख्या.

TE 1/17
3/2
All D.S.

( राधाकृष्ण विखे पाटील )

प्रति,

प्रधान सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.

DTE कडून माहिती घेणे

कार्यालय : ०३०, तळमजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२
निवास : अ-६ बंगला, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
ई-मेल : vikhepatil.office@gmail.com

## प्रपत्र

| अनु.क्र | मुद्दा | गट-अ | गट-ब | गट-क | गट-ड | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | सन २००५ नंतर सेवेत रूजू झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या /निम शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्गवारीनुसार एकूण संख्या | | | | | |
| २. | या सर्व कर्मचाऱ्यापैकी वर्गवारी नुसार NPS क्रमांक नसणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या | | | | | |
| ३. | या सर्व आस्थापनामध्ये सन २००५ नंतर रूजू झालेल्या कर्मचाऱ्यापैकी अपघाताने किंवा इतर कारणाने मृत झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | | | | | |
| ४. | त्यातील ज्या दिवगंत कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाभ मिळालेला नाही अशा कर्मचाऱ्यांची संख्या | | | | | |

(आपल्या विभागातील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित संस्थांची माहिती स्वंतत्र प्रपत्रात सादर करावी.)

सहसंचालक